परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय क्र. 5 – मुंबई
द्वितीय सत्रांत परीक्षा २०२३-२४

इयत्ता ८ वी — विषय- मराठी (द्वितीय भाषा)

वेळ : १½ तास — एकूण गुण – ४०

---

**प्रश्न १ खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

आपल्या झेंड्याचा मधला भाग पांढरा आहे. त्याचा अर्थ काय? पांढरा रंग प्रकाशाचा, सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे आणि या झेंड्यावरील अशोकचक्र काय सांगते? ते सद्‌गुणांची, धर्माची खूण सांगते. या झेंड्याखाली काम करताना आपण धर्ममय राहू असा त्याचा अर्थ आहे. आपल्या वर्तनाची ही सूत्रे राहू देत. या चक्राचा आणखी काय अर्थ आहे? चक्र म्हणजे गती. हे चक्र सांगते की गतिमान रहा. डबक्यात अडकून राहू नका. केशरी रंग त्यागाचा नि नम्रतेचा निदर्शक आहे आणि हिरवा रंग म्हणजे हरितश्यामल भूमातेचा, या ध्वजाखाली उभे राहून सेवावृत्तीने नि निरहंकारपणे आपण पृथ्वीवर स्वर्ग निर्मू या.

प्रश्न –

१. आपल्या झेंड्यात किती रंग आहेत? कोणते ? (१)

२. चक्र आपणास काय सांगते ? (१)

३. पांढरा रंग कशाचा निदर्शक आहे ? (१)

४. हिरवा रंग कशाचा आहे ? (१)

५. चक्र ही कशाची खूण आहे ? त्याचा अर्थ काय आहे ? (२)

६. केशरी रंग कशाचा निदर्शक आहे ? (१)

**प्रश्न.२ अ) खालील प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (५)**

१. हा माणूस आमच्या गावाच्या .................. पारावर थांबायचा.
१) वडाच्या २) पिंपळाच्या ३) आंब्याच्या

२. सुंदर हरिणी .................. कुरणी निजबाळांसह बागडती.
१) हिरव्या २) पिवळ्या ३) निळ्या

३. माझ्या .............भाषेची काय वर्णावी थोरवी.
१) हिंदी २) इंग्रजी ३) मराठी

४. शेख महंमद फार ........... स्वभावाचा होता.
१) लाजरा २) रागीट ३) संकोची

५. लेखिकेने शेख महंमदला ........... हजाराचा चेक दिला.
१) पंचवीस २) पन्नास ३) दहा

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही पाच) (५)**

१. देवदर्शनाला कोण निघाल्या ?

२. दूरदेशी काय ऐकू येते ?
३. स्वप्नविक्याच्या गाठोड्यात कोणता खाऊ असायचा ?
४. स्वप्नविक्याला कोणता आजार होतो ?
५. लेखिका शेख महंमदकडून काय विकत घेत असे ?
६. लेखिकेने शेखच्या हातावर काय ठेवली ?

**क) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** (४ )

१. झुबेदाचा भाऊ - शेख महंमद याची स्वभाव वैशिष्ट्ये लिहा.
२. मराठी भाषेची वैशिष्ट्ये लिहा.
३. गावात येणाऱ्या माणसाला गावकरी "सपनविक्या" का म्हणत ?

**प्रश्न ३ अ) असे कोण कोणास म्हणाले ? ते लिहा.** (३ )

१. "झुबेदा काय करते ?"
२. "बेटी, मॅडमको सलाम करो ।"
३. "कोण रे बाबा तू ? कुठून आलास ?"

**ब) खालील वाक्प्रचारांच्या जोडया जुळवा.** (२ )

| | |
|---|---|
| १. मती कुंठित होणे | उत्साह निर्माण करणे |
| २. तरतरी पेरणे | तोंडभरुन बोलणे |
| ३. गहिवरुन येणे | विचारप्रक्रिया थांबणे |
| ४. भरभरुन बोलणे | कंठ दाटून येणे |

**प्रश्न.४ अ) सूचनेनुसार उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** (४ )

१. सीमा गावाला गेली. (नामे ओळखा)
२. तो माझा मामा आहे. (सर्वनामे ओळखा)
३. मला सुंदर फुले आवडतात. (विशेषण ओळखा)
४. मुले अभ्यास करतात. (क्रियापद ओळखा)
५. चमचमणारे तारे आकाशात दिसू लागले. (विशेषण ओळखा)

**ब) खालील वाक्यांतील काळ ओळखा. (कोणतेही दोन)** (२ )

१. भरतने गोष्ट सांगितली.
२. बाबा वर्तमानपत्र वाचतात.
३. जॉन फुटबॉल खेळेल.

**प्रश्न.५ अ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** (२

)

१) आकाश २) मेघ ३) पृथ्वी ४) वृक्ष

**ब) विरुध्दार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** (२
)

१) ऊन २) अमृत ३) दूर ४) वर

**क) वचन बदला. (कोणतेही दोन)** (२
)

१) महिना २) फूल ३) देश ४) रत्न

**ड) लिंग बदला. (कोणतेही दोन)** (२
)

१) तरुण २) घोडा ३) मुलगा ४) गोप

* समाप्त *